महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
स.न.८३२ ए. फायनल प्लॉट नं. १७८, १७९.
भांबुर्डा. शिवाजीनगर, पुणे-४११००४.
फोन नं. ०२० २५७०५०००
ईमेल secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं./लेखा /अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/ 1679
राज्य मंडळ, पुणे ४११ ००४
दि. 17 / 04 /२०२६

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
सर्व विभागीय मंडळे.

विषयः- अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी /फी ची प्रतिपूर्ती करण्यावाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.सीएलएस.२०२५/प्र.क्र.३६५/म.३(मदत-१),दि. १० ऑक्टोबर,२०२५
२) शासन निर्णय क्र.सीएलएस.२०२५/प्र.क्र.३६५/म.३, दि. ०९ ऑक्टोबर,२०२५
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१९/प्र.क्र. ४७/एसडी -५, दि. ०१ ऑगस्ट, २०१९
४)शा. शुद्धीपत्रक क्र. संकिर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी -५, दि. ०३/०२/२०२०
५)शा. नि.क्र. एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि. १८/१०/१९९३

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की ,

१. संदर्भिय क्र.३ व ४ च्या शासन निर्णयानुसार, अवर्षणग्रस्त भागातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या आकारण्यात आलेल्या, संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती राज्यमंडळ स्तरावरून, नियमित विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये NEFT/RTGS द्वारे करण्यात येणार आहे.

२. सन २०२५-२६ मध्ये २९ जिल्ह्यातील ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित असे एकूण २८२ तालुक्यातील, इ.१० वी व इ. १२ वी च्या या योजनेस पात्र असलेल्या, नियमित विद्यार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करावयाची आहे.

३. राज्यमंडळाने 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२६' मधील प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी साठी मंडळाच्या संकेतस्थळावर शाळा महाविद्यालयांनी आपल्या लॉगइन -पासवर्ड चा उपयोग करून लॉगइन करावे. अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी Option तेथे उपलब्ध होईल. सदर माहिती भरण्याकरीता **सोमवार दि. २०/०४/२०२६ ते शनिवार दि. २/०५/२०२६** हा कालावधी देण्यात येत आहे.

४. राज्यमंडळाने उपलब्ध केलेल्या माहितीमध्ये नियमित विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक, विद्यार्थ्याचे नाव , बँक खाते क्रमांक, बँक आय एफ एस सी कोड , आधार क्रमांक अशी माहिती उपलब्ध करून दिली आहे.

५. राज्यमंडळाने उपलब्ध करून दिलेल्या माहितीच्या पुढेच पात्र (Qualified ) रकाना उपलब्ध केला असून, त्यामध्ये (Qualified ) असा शेरा संबंधित माध्यमिक शाळा/ उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंद करावयाचा आहे.

६. पात्र विद्यार्थी निश्चित करताना संदर्भिय क्र. ३ व ५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद पात्रता निकष आणि सन २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या अंशतः बाधित /पूर्णतः बाधित तालुक्यांची यादी विचारात घ्यावी. सदर शासन निर्णय उपरोक्त लिंकवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

७. अंशतः बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळांनाच ही योजना लागू आहे . त्यामुळे अंशतः बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळामधील विद्यार्थ्यांचीच माहिती भरावी .

८. पात्र नियमित लाभार्थ्यांना उपरोक्त संदर्भिय क्र. ३ व ४ च्या शासन निर्णयानुसार, राज्यमंडळ स्तरावरून शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा NEFT/RTGS द्वारे विद्यार्थ्यांच्या /पालकांच्या आवेदनपत्रामध्ये नमूद केलेल्या आधार संलग्न खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.

९. सर्व विभागीय मंडळानी आपल्या स्तरावरून शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना माहिती भरण्यासाठी त्वरित कळवावे

(डॉ. दिपक माळी)
सचिव ,राज्यमंडळ
पुणे -०४

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी :-

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन ,मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण ), महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. श्रीम. पल्लवी बच्छाव , कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग .
४. मा.शिक्षण संचालक (योजना ), मध्यवर्ती इमारत , पुणे ४११ ००१.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर /अमरावती/नाशिक/लातूर/कोल्हापूर /बृहन्मुंबई
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),सर्व जिल्हे

यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ भरणेबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळांना सादर करावा.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

स.न.८३२ ए. सारथी कार्यालयाजवळ, फायनल प्लॉट नं. १७८, १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४.

Maharashtra State
Board of Secondary & Higher
Secondary Education, Pune

S.R.No.832-A, Near Sarthi Office, Final Plot No.178,179, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411 004.

☎ Phone No.020-25705000 • Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा. मं./लेखा /अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/2065
राज्य मंडळ, पुणे ४११ ००४
दि. 15/05/२०२6

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय:-** अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी /फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत..

**संदर्भ :-** क्र. रा. मं./लेखा /अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/१६७९, राज्य मंडळ दि. १७/०४/२०२६.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना फी माफी /फी ची प्रतिपूर्ती करण्याकरीता विद्यार्थ्यांची माहिती भरणेसाठी दि. २०/०४/२०२६ ते दि. ०२/०५/२०२६ पर्यंत लिंकवर माहिती भरणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार काही विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाली आहे तरी विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरीता पुनःश्च दि. २०/०५/२०२६ ते दि. ०५/०६/२०२६ या कालावधीत लिंक सुरु करण्यात येत आहे.

तरी सर्व विभागीय मंडळांनी आपल्या स्तरावरून आपल्या कार्यकक्षेतील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सदर कालावधीत माहिती भरणेबाबत त्वरित कळवावे.

(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे -०४

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी :-

५. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन ,मंत्रालय, मुंबई ३२.
६. मा.आयुक्त (शिक्षण ), शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य , मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
७. श्रीम. पल्लवी बच्छाव , कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
८. मा.शिक्षण संचालक (योजना ), मध्यवर्ती इमारत , पुणे ४११ ००१.

प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-

३. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर /अमरावती/नाशिक/लातूर/कोल्हापूर /बृहन्मुंबई
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),सर्व जिल्हे

यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ भरणेबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरून सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळांना सादर करावा.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

क्रमांक पुविमं/लेखा-३/अवर्षणग्रस्त फीमाफी 3351
पुणे - ४११००४१
दिनांक : १८/०५/२०२६
२०

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा-क. महाविद्यालये

---

विषय : अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फीमाफी / फीची प्रतिपूर्ती करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत...

संदर्भ : १. क्र.रा.मं./लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/६७९ दिनांक १७/०४/२०२६
२. क्र.रा.मं./लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी-प्रतिपूर्ती २५-२६/२०६५ दिनांक १५/०५/२०२६

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये राज्य मंडळाने पत्रात उल्लेख केलेल्या शासन निर्णयाद्वारे अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशत: बाधित व व २५१ पूर्णत: बाधित तालुक्यातील इ. १० वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/फीची प्रतिपूर्ती राज्य मंडळ स्तरावरून नियमित विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न बँक खात्यावर NEFT/RTGS द्वारे करण्यात येणार असल्याचे कळविले होते. त्यानुसार काही विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाली आहे तरी विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता पुन:श्च **दि. २०/०५/२०२६ ते दि. ०५/०६/२०२६** या कालावधीत् लिंक सुरू करण्यात येत आहे.

त्यासाठी ज्या शाळा /क. महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची माहिती अद्याप भरली त्यांनी उपरोक्त कालावधीत संदर्भ क्र. १ मधील पत्रात नमूद केलेल्या सूचनांनुसार आपल्या शाळा /क. महाविद्यालयातील बाधित विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Kale Vaishali Kashinathrao
Date: 20-05-2026
16:00:25

(वैशाली काळे)
सहायक सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे

Scanned with OKEN Scanner